पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

■ वर्ष ७६ वे/अंक १७८ वा ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

■ अमरावती, शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ■ ■ भारतीय सौर २५ माघ १९४७ ■


# लोकसभा अध्यक्षांच्या दालनात राडा

## मोदींनाही दिल्या धमक्या, भाजपचा विरोधकांवर आरोप

नवी दिल्ली दि. १२ : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आता थेट लोकसभा अध्यक्षांच्या दालनापर्यंत पोहोचला आहे. काँग्रेसच्या २० ते २५ खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या दालनात बेकायदेशीरपणे प्रवेश करून अपशब्द उच्चारले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना धमकावले, असा खळबळजनक आरोप केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केला. या संपूर्ण घटनेचा एक व्हिडिओ देखील रिजिजू यांनी शेअर केला असून, यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

किरेन रिजिजू यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ४ फेब्रुवारी रोजी घडली. काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांच्या दालनात बेकायदेशीरपणे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले. रिजिजू म्हणाले की, सुमारे २० ते २५ खासदार अध्यक्षांच्या दालनात घुसले आणि त्यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अपशब्द वापरले. यावेळी तिथे प्रियांका गांधी आणि केसी वेणुगोपाल यांच्यासारखे ज्येष्ठ नेतेही उपस्थित होते. मात्र, त्यांनी खासदारांना रोखण्याऐवजी त्यांना भांडण्यासाठी उद्युक्त केले.

सभापतींचे दालन हे सभागृहाचा भाग मानले जाते, जिथे व्हिडिओ शूटिंग करणे नियमांच्या विरोधात आहे. दालनात उपस्थित खासदारांनी केवळ अध्यक्षांचा अपमान केला नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही धमकावले. अध्यक्ष ओम बिर्ला हे अतिशय साधे व्यक्ती आहेत, अन्यथा त्यांनी यापूर्वीच कठोर कारवाई केली असती, असे रिजिजू यांनी स्पष्ट केले.

हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. संसदेच्या नियमावलीनुसार, अध्यक्षांच्या दालनात (उर्वरित पान २ वर)

## राहुल गांधींना निवडणूक लढण्यास आजीवन बंदी?



नवी दिल्ली दि. १२ : भारतीय जनता पक्षाने गुरुवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. राहुल गांधींनी ट्रेड डीलवरून सरकारवर केलेले आरोप भाजपच्या खासदारांनी फेटाळून लावले आहेत. त्यानंतर आज संसदेत राहुल गांधींच्या विरोधात अपात्रता ठराव मांडला. अपात्रता ठराव मंजूर झाल्यानंतर राहुल गांधींना आजीवन निवडणूक लढण्यास बंदी येऊ शकते, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी राहुल (पान २ वर)

# अजितदादांचा अपघात : विमान कंपनीबद्दल डीजीसीएचा चक्रावून टाकणारा निर्णय




मुंबई दि. १२ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाला १५ दिवस झाले आहेत. २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊ वाजता अजित पवार यांचं विमान अपघातग्रस्त झालं. त्यावेळी अजित पवार मुंबईहून बारामतीला जात होते. अजित पवार यांच्या निधनानंतर व्हिएसआर व्हेंचर्स कंपनीबद्दल शंका व्यक्त केल्या गेल्या. अजित पवार याच कंपनीच्या विमानातून प्रवास करत होते. अजित पवार यांचे पुतणे, आमदार रोहित पवार यांनी परवा पत्रकार परिषद घेत व्हिएसआर कंपनीच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले.

अजित पवार व्हिएसआर कंपनीच्या मालकीच्या लियरजेट विमानातून प्रवास करत होते. या कंपनीची देखभाल दुरुस्ती, पायलट्सच्या शिफ्ट, विमानातून अवैधपणे सुरु असलेली पेट्रोल वाहतूक अशा अनेक गोष्टी रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मांडल्या. व्हिएसआर कंपनीच्या एका विमानाला २०२३ मध्ये मुंबई विमानतळावर अपघात झाला. त्या अपघाताचा चौकशी अहवाल अद्याप समोर आलेला नाही. या कंपनीवर ए□ड□या आंतरराष्ट्रीय संघटनेनं कारवाई केलेली आहे. मग उ्रऋ्छ□या कंपनीला पाठीशी का घालतेय, असा प्रश्न रोहित पवारांनी विचारला. आता याच कंपनीबद्दल धक्कादायक माहिती समोर आली आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं (डीजीसीए) देशातील (पान २ वर)

# १० कामगार संघटनांच्या भारत बंदचा संमिश्र परिणाम

## एसटी बसचा वेग मंदावला, बँकिंग सेवा विस्कळीत

नवी दिल्ली दि. १२ : केंद्र सरकारच्या नव्या कामगार कायद्याच्या विरोधात देशातील १० प्रमुख कामगार संघटना आणि शेतकरी संघटकांनी आज देशव्यापी भारत बंदची हाक दिली होती. याला महाराष्ट्रातील काही संघटनांनीही पाठिंबा दिला होता. भारत बंदचा महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणात परिणाम दिसून आला. काही जिल्ह्यात एसटी बसेच्या सेवांवर परिणाम झाला होता. तर बँकिंगची सेवाही विस्कळीत झाली होती. राज्यातील अनेक बाजारपेठात शुकशुकाट होता. पाहूयात महाराष्ट्रावर नेमका काय परिणाम झाला.

भारत बंदचा फटका महाराष्ट्रात सर्वाधिक बँकिंग क्षेत्राला बसणार आहे. 'ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन' सह अनेक संघटनांनी आजच्या संपात सहभाग घेतला. त्यामुळे सरकारी बँकांमधील कामकाज, चेक क्लिअरन्स आणि रोख व्यवहार विस्कळीत झाले. णझख, नेट बँकिंग आणि □ढ्च् सेवा सुरळीत असल्यामुळे थोडा दिलासा मिळाला.

भारत बंदला महाराष्ट्रातील 'संयुक्त कृती समिती'ने पाठिंबा दिला होता. त्याचा फटका एसटी बसेसच्या सेवांवर झालाय. काही जिल्ह्यांत एसटी बसच्या फेऱ्या कमी झाल्याचे दिसले. (उर्वरित पान २ वर)

## भाजप खासदारांची नोटिस- राहुल यांचे सदस्यत्व रद्द व्हावे; ते देशाची दिशाभूल करत आहेत; रिजिजूंनी अध्यक्षांच्या चेंबरमधील व्हिडिओ जारी केला



नवी दिल्ली दि. १२ : गुरुवारी अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान झालेल्या गोंधळामुळे लोकसभेतील प्रश्नोत्तराचा तास पुन्हा एकदा विस्कळीत झाला. सकाळी ११ वाजता सभागृह सुरू होताच विरोधकांनी गोंधळ घातला. खासदार फलक आणि पोस्टर्ससह वेलमध्ये घुसले. घोषणाबाजी सुरूच राहिली.

अध्यक्षांच्या खुर्चीत असलेले सभापती केपी टेनेटी यांनी अवघ्या सात मिनिटांनी सभागृह तहकूब केले. दुपारी १२ वाजता लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले. दरम्यान, पंतप्रधान मोदी आज राज्यसभेत पोहोचले.

दरम्यान, भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी गुरुवारी लोकसभेत राहुल गांधींविरुद्ध एक ठोस प्रस्ताव मांडला. त्यांनी राहुल गांधींवर देशाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. दुबे यांनी राहुल गांधींचे संसदेतील सदस्यत्व रद्द करण्याची आणि निवडणूक लढवण्यावर आजीवन बंदी घालण्याची मागणी केली.

ठोस प्रस्ताव हा असा प्रस्ताव आहे ज्यावर सभागृह थेट चर्चा करू शकते आणि त्यावर निर्णय घेऊ शकते. या प्रस्तावात विशिष्ट मुद्द्यावर सभागृहाचा निर्णय स्पष्टपणे नमूद केला आहे.

तत्पूर्वी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी एक्स वर एक व्हिडिओ पोस्ट केला, ज्यामध्ये ४ फेब्रुवारी रोजी लोकसभा अध्यक्षांच्या दालनात झालेल्या गोंधळाची माहिती आहे. रिजिजू यांनी दावा केला की विरोधी खासदारांनी प्रियंका गांधी यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर शिवीगाळ केली.

तथापि, प्रियंका गांधी म्हणाल्या की हे आरोप खोटे आहेत. त्यांनी कोणालाही चिथावणी दिली नाही. त्या गप्प राहिल्या. शेवटी, त्यांनी शांतपणे आपले विचार व्यक्त केले.

हक्कभंग (पान २ वर)

## वि. सा. संघाची निवडणूक आता फिरणार साडेतीन पॅनेलभोवती

नागपूर दि. १२ : विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या चार निवडणुकीत उमेदवारांनी त्यांचे पॅनेल निश्चित केले असून ही निवडणूक आता गटागटांतील चुरस वाढविणारी ठरणार आहे. गिरीश गांधी यांनी २२ सदस्यांचे पॅनेल जाहीर केल्यानंतर रवींद्र शोभणे यांनीही त्यांच्या पॅनेलची घोषणा केली आहे. मात्र, शोभणेंच्या पॅनेलमध्ये आठच सदस्य असल्याने साडेतीन पॅनेल मैदानात उतरल्याची चर्चा आहे.

अध्यक्ष म्हणून गिरीश गांधींच्या पॅनेलमध्ये अरुणा सबाने, अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेणारे लखनसिंह कटरे, विष्णू मनोहर, शुभदा फडणवीस, बाळ कुळकर्णी, संदीप (उर्वरित पान २ वर)

## राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ५०१२ सहायक प्राध्यापक पद भरतीस मान्यता

मुंबई दि. १२ : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, (उर्वरित पान २ वर)

## माहोल....




वंदे मातरम म्हणायला लोकांना जबरदस्ती करायची कशी, हा विचार करतोयआधी मला कुणीतरी ती पाठ करून देईल का?

## शिवाजी महाराजांना युनेस्कोचा मानाचा मुजरा



मुंबई दि. १२ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र आज राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अँड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्विकारले (पान २ वर)











